अमृतमहोत्सवी अंक

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक ३-४, शक १९०६-०७

सावनूरचे नबाब : ऐतिहासिक कागदपत्रे

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 3-4, Jan.1985-April 1985

Nawabs of Savanur : Historical Documents

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहाससंबंधी निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

वर्ष ६३, अंक ३-४, शक १९०६-०७

सावनूरचे नबाब : ऐतिहासिक कागदपत्रे

Quarterly

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 63, No. 3-4, Jan.1985-April 1985

Nawabs of Savanur : Historical Documents

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्यांच्या नियमानुसार अनुदान मिळालेले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकांकडे आहे. त्यांचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
मुद्रक : मा. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

कै. श्रीमती इंदिरा गांधी



भारताच्या दिवंगत पंतप्रधान श्रीमती **इंदिरा गांधी** या आपल्या इतिहासातील एक अत्यंत संस्मरणीय व्यक्ती होत. दृढनिष्ठा, जनतेच्या उद्धाराची विलक्षण तळमळ आणि खंबीर नेतृत्व यांचा इंदिराजींच्या ठिकाणी संगम होता. भारतीय जनतेच्या अस्मितेचे त्या एक प्रतीकच झाल्या होत्या. राष्ट्रीय ऐक्याचे रक्षण करताना त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले. त्यांना आमचे वंदन.

※

कै. यशवंतराव चव्हाण



कै. **यशवंतराव चव्हाण** हे मंडळाचे अलिकडच्या काळातले सगळयात मोठे अधारस्तंभ. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कै. यशवंतरावांनी जे यत्न केले त्यात निरनिराळया शिक्षणसंस्था, संशोधनसंस्था, साहित्यिकसंस्था या सगळयांना हरप्रकारे सहाय्य करणे हा प्रमुख भाग होता. भारत इतिहास संशोधक मंडळाला मा. यशवंतरावांच्या सुजाण नेतृत्वाचा फार मोठा लाभ झाला आहे. मंडळाची नवी इमारत ही त्यांच्याच यत्नाचे फल आहे. पुढच्या काळातहि मंडळाच्या कार्यात सहाय्याचा लाभ मिळत जाईल अशी आशा होती. परंतु मृत्यूने हा आपला नेता हिरावून नेला आहे.

※

....पाच....

कै. गणेश हरी खरे



भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष गणेश हरी खरे यांनी आपली इहलोकीची यात्रा वयाच्या ८५ व्या वर्षी, १९८५ च्या जूनमध्ये संपविली. अविश्रांत परिश्रम, चतुरस्त्र बुद्धी आणि अतुल निष्ठा यांचे बळावर त्यांनी केलेली ज्ञानाची आणि मंडळाची सेवा अमोल आहे. या सेवेची, ज्ञानसाधनेची पोच मंडळाने त्यांना दहा वर्षांहून जास्त काळ कार्याध्यक्ष निवडून, समाजाने, निरनिराळ्या विद्वत् परिषदांचे अध्यक्षस्थान देऊन आणि शेवटी पुणे विद्यापीठाने सन्माननीय डॉक्टरेट देऊन दिली. असा कोणताही सन्मान मिळाला किंवा दिला तरी त्यांनी मंडळासाठी केलेल्या कार्याचा ऋणभार कमी होणार नाही, "तात्या, आम्ही तुमचा आदर्श कायम डोळ्यासमोर ठेवून कार्य करीत राहू." एव्हढे एकच आश्वासन त्यांना समाधान देईल. मंडळाच्या सर्व सभासदांच्या आणि कार्यकर्त्यांच्या वतीने आम्ही ते देतो.

❋

ऋणनिर्देश

त्रैमासिकाच्या या अंकात, मंडळाच्या दफ्तरखान्यात उपलब्ध असलेल्या 'दिलेरजंगी' या नावाने ज्ञात असलेल्या शिळाछापातील व मोडी लिपीतील छापील ग्रंथातील निवडक अकरा उतारे पुनर्मुद्रित केले आहेत. हा ग्रंथ अत्यंत दुर्मिळ असल्यामुळे, असे पुनर्मुद्रण करणे उपयुक्त व आवश्यक वाटले. याशिवाय पुणे पुराभिलेखागारातील विविध आकारांची दहा हस्तलिखित कागदपत्रेही या अंकात प्रथमच प्रकाशित होत आहेत. सावनूरच्या सामाजिक, आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने या कागदांचे महत्त्व अभ्यासकांच्या लक्षात येईलच.

दिलेरजंगी ग्रंथातील उतारे पुनर्मुद्रित करण्यास परवानगी दिल्याबद्दल मंडळाच्या अधिकाऱ्यांचे, तसेच पुणे पुराभिलेखागारातील हस्तलिखितांच्या प्रकाशनास (जावक क्र. ५०३, दि. १८-२-१९८५ या पत्रान्वये) अनुमती दिल्याबद्दल श्री. भास्करराव घटावकर, संचालक, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, यांचा मी आभारी आहे. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथपालांनी आपल्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या 'तारीख-ए-दिलेरजंगी' या फारसी ग्रंथातील सावनूर नवाबासंबंधी सात चित्रांची छायाचित्रे या अंकात प्रकाशित करण्यासाठी काढून पाठविली. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या अंकाची मुद्रणप्रत तयार करण्याच्या कामी मला माझे सहकारी डॉ. वा. द. दिवेकर व डॉ. मा. रा. कंटक यांचे भरपूर साहाय्य झाले आहे. डॉ. ग. ह. खरे यांनी मुद्रणप्रत चाळून, काही उपयुक्त सूचना केल्या. मंडळाचे चिटणीस डॉ. म. श्री. माटे, डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी व डॉ. उषा रानडे यांनी त्रैमासिकाच्या द्वारे ही कागदपत्रे प्रकाशित करण्यास अनुमती दिली. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

गुढी पाडवा
(दि. २२ मार्च, १९८५)

कृष्णाजी नागेशराव चिटणीस

अनुक्रमणिका

नकाशे व छायाचित्रे

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६३ : ३-४, १९८५

सावनूरचे नबाब

कर्नाटकामध्ये धारवाड जिल्ह्यात सावनूर हे एक तालुक्याचे ठिकाण आहे. १७ व्या शतकाच्या उत्तरार्धात व १८ व्या शतकात ते सावनूर संस्थानचे* राजधानीचे ठिकाण होते. लष्करीदृष्ट्याही या ठिकाणाला महत्त्व होते. दक्षिणेस तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यांच्या दुआबात ते वसलेले असून मराठा राज्यातून दक्षिणेकडे म्हैसूरच्या राज्याकडे जाणाऱ्या महामार्गावर ते होते. दोन नद्यांच्या पाण्याने सिंचित झालेल्या प्रदेशात समृद्ध पीक येत असून हा प्रदेश ज्याच्या ताब्यात त्याला महसुलाचे उत्पन्न भरपूर प्रमाणात मिळण्याची सोय होती. म्हणूनच मराठे व म्हैसूरकर दोघेही हा प्रदेश आपल्या ताब्यात आणण्यासाठी सदैव झगडत असत. दख्खनच्या मध्ययुगीन इतिहासात अशा रीतीने सावनूर संस्थानला बरेच राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते.

सावनूरचे नवाब मूळचे अफगाणिस्तानचे. अब्दुल करीमखान हा त्यांचा मूळ पुरुष. त्याचा पंधरावा वंशज मलीक अवतारखान तैमूरबरोबर हिंदुस्थानात आला. त्यानंतर अठरावा वंशज दोदाखान याने ' नबाब ' ही पदवी धारण केली.[1] आणि त्याच्या वेळेपासूनच मुघल दरबारात हे नबाब महत्त्व पावू लागले. मियाना जमातीचे हे असल्याने त्याना ' खान मियाना ' असेही संबोधीत.

या घराण्यातील विसावा वंशज नबाब बहलोलखान दक्षिणेत आला व विजापूर येथे दुसऱ्या अली आदिलशहाच्या सेवेत रुजू झाला.[2] बहलोलखानाचा मुलगा अब्दुल रहीम याला कोप्पळची जाहगीर मिळाली होती. शिवाजीने १६६० साली केलेल्या हल्ल्याला यानेच मुख्यत्वेकरून तोंड दिले. प्रथम मुधोळच्या बाजी घोरपड्याबरोबर व नंतर खवासखानाबरोबर याने शिवाजीविरुद्धच्या लढाईत भाग घेतला.[3]

अब्दुल रहीमचा मुलगा करीम हा विजापूर दरबारात एक शक्तिशाली सरदार म्हणून ओळखला जाऊ लागला. इ. १६७५ मध्ये तो विजापूरचा मुख्य वजीर झाला व हे पद त्याच्याकडे इ. १६७७ पर्यंत होते.[4] मिरजची

*सावनूर संस्थान व त्याच्या आसपासचा उत्तर कर्नाटकातील प्रदेश म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दुआबातील मुलूख, पुढे ब्रिटिश काळात सदर्न मराठा कंट्री या नावाने ओळखला जाऊ लागला.

जहागीर त्याच्याकडे होती.[५] एक अत्यंत प्रभावी सरदार व शिवाय मुख्य वजीर असा तो असल्याने इतर सरदार व सत्ताधीश त्याच्याशी सलोख्याचे संबंध ठेवण्यात आपसात स्पर्धा करीत. अडोनीचा सत्ताधीश मसौदखान याने आपली मुलगी त्याला देऊन त्याला आपला जावई करून घेतले. या संबंधामुळे विजापूर दरबारातील हबशी सरदारांचा त्याला पाठिंबा मिळाला होता. याचप्रमाणे हुंडा म्हणून बागलकोटही त्याला मिळाले होते. स्वतः मसौदखान हा सिद्दी जोहाराचा जावई असल्याने जोहाराचा पाठिंबाही अब्दुल करीमला मिळाला.[६] यानंतर लवकरच अब्दुल करीमखानाला बावीस महाल असलेली सरकार बंकापूरची जाहगीर आदिलशाहाकडून मिळाली.[७] याच प्रसंगाने सावनूर संस्थानची स्थापना झाली, असे आपणास म्हणता येईल.

इ. १६७२ मध्ये दुसऱ्या अली आदिलशहाचा मृत्यू झाल्यावर विजापूर दरबारात सत्तेसाठी बरीच रस्सीखेच झाली. त्यात अब्दुल करीमला सत्ताभ्रष्ट करून आपल्या हातात सत्ता काबीज करण्यात दौलत खवासखान यशस्वी झाला. तथापि सरतेशेवटी दौलत खवासखानाला सत्तेवरून खाली खेचण्यात व राज्याचा कारभारी म्हणून आपल्या हातात सत्ता घेण्यात करीमखानाला यश मिळाले.

इ. १६८६ साली विजापूरच्या पतनानंतर करीमखानाचा मुलगा अब्दुल राउफखान हा औरंगजेबाच्या सेवेत रुजू झाला. मुघल बादशहाने त्याला 'दिलेरखान बहादुर दिलेरजंग' असा किताब देऊन त्यास ७००० जात व ६००० स्वार अशी मन्सब मुकर केली. किल्ले सरकार बंकापूर, सरकार आजमनगर, सरकार तोरगल आणि बावीस महाल अशी दोन कोटी चाळीस हजार रुपये उत्पन्नाची जाहगीर त्यायोगे त्यास मिळाली.[८] कित्तूर, नवलगुंद, शिरहट्टी आणि डंबळ या उत्तर कर्नाटकातील बंडखोर सत्ताधिशांचा बीमोड करण्याचे काम त्याच्यावर सोपविण्यात आले. इ. १७१९ मध्ये अब्दुल राउफखानाच्या मृत्यूनंतर नवाबपणाच्या अधिकारासाठी थोडा काळपर्यंत त्याच्या मुलांत चुरस झाली. परंतु शेवटी अब्दुल गफारखान हा नवाब झाला. मुघल बादशहाकडून बाळाजी विश्वनाथाने ज्या तीन सनदा मिळविल्या होत्या त्यात निर्दिष्टिलेल्या भूप्रदेशाबाहेरही मराठी राज्याचा विस्तार या काळी चालू होता. अशा परिस्थितीत रास्त्यांच्या हल्ल्याला गफारखानाला तोंड द्यावे लागले, आणि परिणामतः स्वतःकडचे मिश्रीकोट मराठ्यांना द्यावे लागले.[९]

शेजारील प्रदेशातील छोट्या सत्ताधिशांचा निजामाच्या साहाय्याने पराभव करून अब्दुल गफारखानाने आपले राज्य वाढविण्यास सुरुवात केली. लक्ष्मेश्वरच्या देसगतीचा (छोटेसे राज्य) याच पद्धतीने बळी पडला. शाहूने लक्ष्मेश्वरवर आपले अधिराज्य स्थापन केले होते. लक्ष्मेश्वरचा देसाई खानगौडा याची स्थिती भक्कम नव्हती. मराठ्यांतही आपसात वैमनस्य होते. या दोहींचा फायदा घेऊन गफारखानाने लक्ष्मेश्वरच्या किल्ल्यावर हल्ला चढविला व तो काबीज केला. जेव्हा तो

लक्ष्मेश्वर शहरावर चालून जाण्याचे व सर्व देसगतच बळकाविण्याचे मनसुबे रचू लागला तेव्हा खानगौडा याने शाहूकडे मदतीची याचना केली. शाहूनेही तातडीने येसाजी भोसले व घनःश्याम नरहर याना सैन्य देऊन लक्ष्मेश्वरच्या साहाय्यार्थ रवाना केले (इ. १७३९).[१०]

गफारखानाच्या मृत्यूसमयी कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील जवळ जवळ सर्व प्रदेश, ईशान्येकडील थोडासा भाग वगळता, त्याच्या ताब्यात होता. या प्रदेशाला त्याचा मुलगा अब्दुल मजीद दिलेरखान हा वारस म्हणून आला. पण थोड्याच काळात निजामाने त्याच्यावर स्वारी करून त्याला तह करण्यास भाग पाडले. मजीदखानाने मराठ्यांचे अधिराज्य धुडकावून देण्याचा प्रयत्न केला, तरीही उत्तरेकडून होणारे मराठ्यांचे हल्ले बंद झाले नाहीत.[११]

नबाब अब्दुल मजीदखान याने आपल्या राज्याचा विस्तार बेळगाव, विजापूर, रायचूर आणि धारवाड या जिल्ह्यांत केला होता. धारवाड जिल्हा हा या राज्याच्या केन्द्रस्थानीं असून, बेळगाव व विजापूर जिल्ह्यांचे काही भाग व रायचूर जिल्ह्याचा अल्प भाग त्यात मोडत होता. या राज्याची उत्तरेकडील सीमा ही पाच्छापूर ते बीळगीपर्यंत, दक्षिणेकडील सीमा मासूर ते हरिहरपर्यंत, पूर्वेकडील सीमा कोप्पळ ते कनकगिरीपर्यंत आणि पश्चिमेकडील सीमा बेळगाव (आजमनगर) ते तेगूर, मिश्रीकोटी व निडसंगीवरून हानगलपर्यंत होती.

इ. १७४५ च्या सुमारास पेशवा, कोल्हापूरचा संभाजी व हैद्राबादचा निजाम यांच्यात कर्नाटक ताब्यात घेण्यासाठी तिरंगी लढत चालू होती. ती मुख्यत्वे सावनूरच्या प्रदेशाजवळ चालली असल्याने सावनूरच्या नबाबालाही ह्या धुमश्चक्रीत भाग घ्यावा लागला. इ. १७४५ च्या एका बातमीपत्रात म्हटले आहे की, सावनूरच्या प्रदेशावर आपला अधिकार स्थापन करण्यासाठी पेशव्याने चालवलेल्या प्रयत्नाला काटशह म्हणून सावनूरच्या नबाबाने कोल्हापूरचा दुसरा संभाजी याची मदत मागितली होती.[१२]

इ. १७४७ त नाइलाज होऊन पेशव्याशी तह करीपर्यंत सावनूर नबाब व पेशवा यांच्यातील संबंध वैमनस्याचेच होते. या तहाने सावनूरच्या नबाबाला आपल्या ताब्यातील पस्तीस महालांचा ताबा पेशव्याकडे द्यावा लागला. बावीस महालांसह सरकार बंकापूरचा ताबा मात्र आपल्याकडे ठवता आला. जे बावीस महाल त्याच्या ताब्यात राहिले ते असे : (१) परगणा कुंदगोळ, (२) परगणा कारडगी–कमतराण, (३) परगणा मिश्रीकोट, (४) समत कलघटगी, (५) समत बम्मीगट्टी, (६) स. तडस, (७) स. केरूर बुद्रुक, (८) स. केरूर खुर्द, (९) स. कोड, (१०) स. कागिनेली, (११) प. राणेबिन्नूर, (१२) स. निडसंगी, (१३) स. शिग्गांव, (१४) प. हागनल, (१५) प. बंकापूर, (१६) प. तिळवळ्ळी, (१७) प. आडूर, (१८) कुपेलूर, (१९) स. मासूर, (२०) पेठ कसबा हावेरी, (२१)

पेठ हांसभावी, (२२) देहात किल्ले ऐरणी.[१३] शिवाय या कराराने एकमेकांचे शत्रू दोघांचेही समान शत्रू मानावेत, पेशव्यांनी स्वादि व बिदनूरवर स्वारी करताना, आणि एकंदरीतच दक्षिण हिंदुस्थानात ससैन्य जाताना कोणत्याही प्रकारे सावनूरच्या प्रदेशावर हल्ले करू नयेत, असेही ठरले.

आपण लष्करीदृष्ट्या कमकुवत असताना पडते घ्यावे व योग्य ती तयारी झाली की गमावलेला प्रदेश परत मिळवावा, असे सावनूरच्या नबाबाचे या वेळचे धोरण होते. मजीदखान इ. १७५४ त वारला आणि त्याच्या जागी राज्यावर त्याचा मुलगा अब्दुल हकीमखान आला. हकीमखान व पेशवे यांच्यातील वैमनस्य वाढतच गेले व त्याची परिणती शस्त्रांच्या खणखणाटात झाली. पुन्हा एकदा पेशव्याचा जय झाला व इ. १७५६ मध्ये सावनूरच्या नबाबाला आपला आणखी काही प्रदेश तोडून द्यावा लागला. या प्रसंगी उभयपक्षात झालेल्या करारात, नबाबाने पेशव्याला द्यावयाच्या महालांची यादी दिलेली आहे. या कराराचा काही तपशील असा :

भाग १

(अ) सरकार बंकापूर, तोरगल आणि आजमनगर यांतील परगणे, समत, तपे, पेठा, कसबे इत्यादी करून अडतीस महालांचा रु. ८,२३,९२६ व आठ आणे एवढ्या किंमतीचा प्रदेश नबाबाने पेशव्याला द्यावयाचा.

(आ) नबाबाने पेशव्याकडे अकरा लक्ष रुपयांचा भरणा करावयाचा. पैकी रु. ३,१०,००० रोख किंवा हिरे, हत्ती, किंमती मौल्यवान वस्त्रे यांच्या स्वरूपात त्वरित भरावयाचे. उरलेल्या ७,९०,००० रु. पैकी ४,९०,००० रु. एका पंधरवड्यात भरावयाचे व तीन लक्ष रुपयांसाठी बंकापूरचा किल्ला मल्हारराव होळकराच्या मध्यस्थीने पेशवेसरकारकडे गहाण ठेवावयाचा. किल्ला सोडवून घेण्यासाठी नबाबाने सहा महिन्यांच्या आत उरलेली रक्कम भरावयाची, अन्यथा तो किल्ला पेशवे सरकारकडे कायमचा रहावयाचा.

(इ) रायरहुबळीचा किल्ला, केरूरचा किल्ला त्याच्या परगण्यासह, कसबा बेळगाव त्याच्या किल्ल्यासह हा रु. ४५,२१२-८-२ या किंमतीचा प्रदेश पेशवे सरकारकडे जावयाचा.

भाग २

(अ) हकीमखानाकडे परगणा कारडगी, समत निडसंगी, प. हानगल, स. तिळवळ्ळी, राणेबिन्नूर, नरेगल, प. गुत्तल, पेठ हावेरी, कसबा बंकापूर, ऐरणी, प. अणीगेरी, परसगडचा किल्ला गावासह, आजमनगर सरकारातील परगणे संपगावमधील दोडवाड, आणि स्वादि हा एकूण रु. ८,३०,०६८ आणे बारा या किंमतीचा प्रदेश त्यातील कसबे व खेडी यांसह रहावयाचा.

(आ) परगणे रट्टेहळ्ळीमधील रु. १९,००० चे तनखा उत्पन्न जहागिरदारांकडे जावयाचे.

(इ) किल्ले बंकापूर येथील रु. ११,००० चे जहागीर तनखा उत्पन्न नबाबाच्या उत्पन्नांतून वगळण्यात यावयाचे.

(ई) अजीजमिया व अहमदखान वलद अलीमिया या दोन जुन्या जहागिरदारांकडे रु. २५,००० किंमतीची पाच खेडी रहावयाची.

(उ) निजाम सलाबतजंगापासून पेशव्याने सावनूर नबाबाच्या प्रदेशाचे रक्षण करावयाचे.

(ऊ) मराठा सैन्याकडून नबाबाच्या प्रदेशाला उपसर्ग व्हावयाचा नाही व खंडणीच्या वसुलीसाठी दरवर्षी नबाबाला पेशव्याने सतवायचे नाही.[१४]

इ. १७६१ नंतर मराठ्यांच्या इतिहासाचा एक कालखंड संपला व नव्यास सुरुवात झाली, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यानंतर थोरले माधवराव पेशवे, हैदरअली व हैद्राबादचा निजामअली यांच्यात सावनूर प्रकरणावरून तंट्यास सुरुवात झाली. पानिपतवरील मराठ्यांच्या पराभवाचा एक परिणाम म्हणून हैदरअलीला कर्नाटकचा प्रदेश आपल्या ताब्यात घेण शक्य झाले. हैदरने इ. १७६४ मध्ये हकीमखानाचा पराभव करून त्याच्याकडून स्वादीचे ठिकाण घेतले आणि थोड्याच काळात कृष्णा नदीच्या तीरापर्यंत आपले राज्य वाढविले. माधवराव पेशव्याने सावनूरचे राज्य आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला; काही वेळा तो यशस्वीही झाला, पण ते राज्य सर्वसाधारणपणे हैदरअलीच्या ताब्यातच होते असे म्हणावे लागेल. इ. १७७८ च्या सुमारास या प्रदेशात हैदरअलीची सत्ता बरीच प्रबळ होती.

इ. १७७९ मध्ये सावनूरच्या नबाबाशी विवाहसंबंध जोडून हैदरने आपल्या सत्तेचा पाया सावनूरमध्ये आणखी भक्कम केला. हकीमखानाचा मुलगा खैरखान यास त्याने आपला जावई करून घेतले. या वेळच्या एका तहाने, हैदरने हकीमला बागलकोट व इतर महाल परत करावेत व त्यांच्या मोबदल्यात दोन हजारांचे घोडदळ बाळगून हकीमने हैदरच्या मदतीसाठी कायमचे सज्ज रहावयाचे, असे ठरले.

इ. १७८२ त हैदरचा मृत्यु झाल्यावर म्हैसूर व सावनूर यांच्यातील संबंध तितकेसे सलोख्याचे राहिले नाहीत व हकीम पेशव्याच्या तावडीत सापडला. यावेळी पेशवे दरबारी नाना फडणविसाचा अधिकार चालत होता. त्याच्या धोरणाने कर्नाटकातील एकेक महाल पेशव्याच्या ताब्यात परत येऊ लागला व शेवटी सावनूरही त्याच्या ताब्यात आले. याचे टिपूस फार वैषम्य वाटले. त्याने क्रोधाने सावनूरवर जोरदार हल्ला चढविला, ते ताब्यात घेतले आणि नबाबाची बरीच मालमत्ता लुटली. तथापि १७८७ च्या गजेंद्रगडच्या तहाने त्याला सावनूरचे अधिकार नबाबाकडे परत करावे लागले. यानंतर मात्र सावनूरचे राज्य पेशव्यांकडेच आले व त्याचा नबाब हकीमखान पुण्यालाच राहू लागला. इ. १७९५ मध्ये त्याचा मृत्यु झाला तोपर्यंत त्याला पेशव्यांकडून दरमहा रु. दहा हजारांचे निवृत्तिवेतन मिळत

असे.[१५] हे निवृत्तिवेतन त्याच्या वंशजांनाही मिळू लागले. परंतु श्रीरंगपट्टणच्या युद्धानंतर निवृत्तिवेतनाऐवजी वार्षिक ४८,००० रु. कमाल उत्पन्नाची पंचवीस खेडी इनाम करून देण्यात आली. पेशवाईअखेरपर्यंत हे इनाम चालू होते.[१६]

संदर्भ

१. दिलेरजंगी, पृ. २.

२. कित्ता, पृ. ३.

३. E. W. West, *A Memoir of the States of the Southern Maratha Country* (Bombay, 1869) p. 206.

४. J. N. Sarkar, *House of Shivaji*, 3rd ed. (Calcutta, 1955), p. 96.

५. कित्ता.

६. E. W. West, *A Memoir*, p. 206.

७. दिलेरजंगी, पृ. ४; E. W. West, p. 206.

८. कित्ता, पृ. ५-६.

९. E. W. West, *op. cit.*, p. 208.

१०. गणेश चिमणाजी वाड (संग्रा.), सातारकर महाराज व पेशवे ह्यांची रोजनिशी (निवडक उतारे), (मुंबई, १९०६), १, क्र. २०५

११. E. W. West, p. 208.

१२. गो. स. सरदेसाई, पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड ११, ले ५८, पृ. ४५-४६.

१३. दिलेरजंगी, पृ. १८-१९; तह व करारमदार, ग. चि. वाड यानी पेशवे दप्तरातून निवडलेले, आणि पु. वि. मावजी व द. ब. पारसनीस यानी संपादिलेले (मुंबई, १९१४), पृ. ८६-८७.

१४. दिलेरजंगी, पृ. २६-३१; तह व करारमदार, पृ. ८८-९३

१५. E. W. West, p. 211.

१६. कित्ता.

■ ■

सावनूर नबाबांची वंशावळ*

- १. रगटी बहलोलखान
  - २. अब्दुल रहीमखान
    - ३. अब्दुल करीमखान
      - ४. अब्दुल राउफखान (१६८६-१७१९)
        - ५. अब्दुल फत्तेखान
        - ६. अब्दुल महमदखान
        - ७. अब्दुल गफारखान (मु. १७१९-१७२५)
          - ८. अब्दुल मजीदखान (१७३०-१७५४)
            - ९. अब्दुल हकीमखान (१७५४-मु. १७९५)
              - ११. अब्दुल खैरखान (१७९८-१८२७)
                - १२. अब्दुल फयाजखान (मृ. १८२८)
                - १३. अब्दुल मुनवरखान (१८२८-१८३४)
                - १४. अब्दुल दिलेरखान (१८३४-१८६२)
                  - १५. अब्दुल खैरखान (१८६२-१८६८)
                    - १६. अब्दुल दिलेरखान
              - १०. अब्दुल हुसेनखान (मु. १७९५-१७९८)
              - अब्दुल अहमदखान
              - अब्दुल महमदखान
            - अब्दुल करीमखान
        - अब्दुल सत्तारखान


* आवश्यक तेवढीच नावे दिलेली आहेत.

The Nawabs of Savanur

Savanur, the headquarters of the Taluka of the same name in the Dharwad District in Karnataka, was the seat of a principality in the Southern Maratha Country in the later seventeenth and eighteenth centuries of the Christian era, and occupied a place of strategical importance in the Deccan. Lying in the Doab enclosed by the Tungabhadra river in the south and the Malaprabha river in the north, it was on the highway running from the Maratha terriories in the north to Hyder's and later on to his son Tipu's territores in the south. As the lands in this area were watered by the two rivers, they yielded abundant crops, and were a source of rich income to whoever possessed them. Hence both the Marathas and the Mysore rulers were always endeavouring to bring this area under their sway. Thus the Savanur principality became a pawn in the power-politics of the Deccan in medieval India.

The Nawabs of Savanur originally hailed from Afghanistan. Abdul Karim Khan was the ancestor of these Nawabs. Malik Avtar Khan, the 15th in descent from the ancestor, came to India along with Taimur. Doda Khan, the 18th in descent, assumed the title of Nawab,[1] and since his days these Nawabs rose to prominence in the Mughal court. They were also known as Khan Miyanas as they belonged to the Miyana clan.

Nawab Bahlol Khan, the 20th in descent from the ancestor, migrated to the Deccan and joined the service of Ali Adil Shah II of Bijapur.[2] Abdul Rahim, the son (and successor) of Bahlol Khan, was enjoying Koppal as his jagir. This Nawab had to bear the brunt of Shivaji's attack about 1660. He was sent against Shivaji first with Baji Ghorpade of Mudhol, and then with Khawas Khan.[3]



१. सावनूर राज्याचा नकाशा

Abdul Rahim's son, Abdul Karim became one of the most powerful nobles in the court of Bijapur. He was raised to the office of Wazir in 1675, and he held that post about three years till 1677.[4] He enjoyed the jagir of Miraj.[5] As he was a very influential baron, and also the Wazir, other chieftains and nobles vied with one another for having relations with him. Masaud Khan, the chief of Adoni gave his daughter in marriage to Abdul Karim. This won him the support of the Abyssinian group in the Bijapur court. He also got Bagalkot by way of dowry. As Masaud Khan himself was the son-in-law of Siddi Jauhar, the latter also gave his support to Abdul Karim.[6]

On the death of Ali Adil Shah II in 1672 there was a struggle for power in Bijapur in which Daulat Khawas Khan managed to get the regency ousting Abdul Karim from power. Nevertheless the latter finally succeeded in getting rid of Daulat Khawas Khan by encompassing his murder, and seized the regency himself. Sikandar Adil Shah conferred on Abdul Karim Bahlol Khan by a Sanad the 22 Mahals of the jagir of Bankapur.[7] And with the grant of this Sanad the Savanur principality may be said to have come into existence.

After the fall of Bijapur in 1686, Abdul Rauf Khan, the son of Karim Khan, accepted the service under Aurangzeb. The Mughal emperor conferred on him a mansab of 7000 *zat* and 6000 *swar*, together with the title of "Diler Khan Bahadur Diler Jang." The jagir consisting of Kille Sarkar Bankapur, Sarkar Azamnagar, Sarkar Torgal with 22 Mahals rated at 2 crore and 40 thousand rupees was continued to him.[8] He was asked to put down the rebellious chiefs in the Southern Maratha Country such as those of Kittur, Navalgund, Shirhatti, Havanur, and Dambal. On the death of Abdul Rauf Khan in 1719, there was a brief period of struggle among his sons for the Nawabship until Abdul Gaffar Khan

became the Nawab. His was the time when the Marathas were re-establishing their power firmly in Maharashtra and expanding outside on the strength of the three Sanads secured by Balaji Vishwanath from Emperor Muhammad Shah. Hence Gaffar Khan too had to face the attack of the Marathas headed by Raste and had to buy them off by ceding Mishrikote to them.[9]

Abdul Gaffar Khan, supported by the Nizam, began to extend his dominions at the cost of small chieftainships in the neighbourhood. Lakshmeshwar was such a small chieftainship or desgat. Shahu had nominally brought Lakshmeshwar under his sway. The position of Khangauda, the chief of Lakshmeshwar, was not strong. Realising this, and also taking advantage of the dissensions in the Maratha camp, Gaffar Khan besieged the fortress of Lakshmeshwar and seized it. When he continued his warlike operations with a view to taking the town itself and to engulf the whole desgat, Khangauda appealed to Shahu for help. Shahu immediately despatched troops headed by Yesaji Bhosle and Ghanashyam Narahar for the rescue of Lakshmeshwar. This was in 1739.[10]

At his death Gaffar Khan's dominion extended almost over the whole territory between the Krishna and Tungabhadra except for a small strip in the north-west which was under the Marathas. To this dominion his son Abdul Majid Diler Khan became heir. Majid Khan tried to throw off his allegiance to the Mughals. Before long a contingent of the Nizam marched against him, and the Nawab was forced to enter into a treaty with Hyderabad. But he had to encounter the attacks of the Marathas from the north.[11]

Nawab Abdul Majid Khan extended his dominion over the districts of Belgaum, Bijapr, Raichur and Dharwad. The district of Dharwad formed the heart of his principality with some portions of Belgaum and Bijapur districts and a very

small portion of Raichur district. It is noteworthy that almost no territory in the Bellary district was included in his principality, it having been completely under the sway of the Nizam of Hyderabad. The northern boundary was marked by a line running from Patshahapur to Bilgi, the southern boundary by a line running from Masur to Harihar, the eastern boundary was bounded by Koppal and Kanakagiri and the western boundary was marked by a line running irregularly from Belgaum (Azamnagar) to Hangal via Tegur, Mishrikoti and Nidsangi.

About 1745 a triangular srruggle was going on in the area of Savanur among the Peshwa, Sambhaji of Kolhapur and the Nizam of Hyderabad for supremacy over Karnatak, and the Nawab of Savanur was caught in this political whirlpool. A news-letter dated 1745 says that the Nawab of Savanur was trying to counteract, with the help of Samhbaji II of Kolhapur, the efforts of the Peshwa to extend his sway in the Savanur area.[12]

The relations between the Peshwa and the Savanur Nawab became increasingly hostile till in 1747 the Nawab was forced to make peace with the Peshwa. By it the Nawab was allowed to retain Sarkar Bankapur, with the following 22 mahals :

(1) Pargana Kundgol, (2) Pargana Karadgi-Kamatran, (3) Pargana Mishrikot, (4) Samat Kalghatgi, (5) Samat Bammigatti, (6) Samat Tadas, (7) Samat Kerur Budruk, (8) Samat Kerur Khurd, (9) Samat Kod, (10) Samat Kagineli, (11) Pargana Ranebinnur, (12) Samat Nidsangi, (13) Samat Shiggaon, (14) Pargana Hangal, (15) Pargana Bankapur, (16) Pargana Tilavalli, (17) Pargana Adur, (18) Kupelur, (19) Samat Masur, (20) Peth Qasba Haveri, (21) Peth Hamsabhavi, (22) Debat Kille Airani.[13] Mahals numbening 35 were surrendered to the Peshwa.

It was agreed between the Peshwa and the Nawab that both should consider the enemy of the other as his own enemy. The forces of the Peshwa would not commit depredations in the Savanur area while marching to Swadi and Bidnur and into South India in general.

The Savanur Nawab kept quiet when weak, but endeavoured to regain the lost power when he felt stronger. Majid Khan died in 1754 and was succeeded bsy his son Abdul Hakim Khan. The hostilities between Hakim Khan and the Peshwa gradually increased resulting in armed clashes. But once again the Peshwa won and a treaty was imposed in 1756 upon the Nawab by which the latter had to cede some more territories to the Peshwa. The text of the treaty gives a list of many mahals including most of the mahals that had been ceded earlier by Majid Khan to the Peshwa. Now all these mahals, rated variously as shown below, were to be surrendered by the Nawab to the Peshwa.

Part I

(A) 38 mahals rated at 8,23,926 rupees and 8 annas including Parganas, Samats, Tapes, Peths, Kasbas, etc. in Sarkar Bankapur, Torgal and Azamnagar were to be surrendered to the Peshwa.

(B) Next it was stipulated that the Nawab should pay a contrbution of Rs. 11,00,000. Of this amount, 3,10,000 were to be immediately paid either in cash or by way of the presents of diamonds, elephants or costly robes. Out of the arrears of 7,90,000, 4,90,000 were to be paid within a fortnight, and for the remaining 3,00,000 the fort of Bankapur was surrendered as a pledge to the Peshwa Government through the instrumentality of Malharrao Holkar. The amount of the mortgage was to be paid within a period of six months to get the fort back, and if it was not paid within that period, the fort was to go to the Peshwa

Government permanently.

(C) The fort of Rayara Hubli, Fort Kerur with its Pargana and Kasba Belgaum with the fort altogether rated at Rs. 45,212-8-2 were to be acquired by the Peshwa.

Part II

(A) Hakim Khan was allowed to retain mahals, military posts, Kasbas and villages such as Pargana Karadgi, Samat Nidsangi, Pargana Hangal, Samat Tilavalli, Ranebinnur, Naregal, Pargana Guttal, Peth Haveri, Kasba Bankapur, Airani, Pargana Annigeri, the fort and village of Parasgad, Dodwad from Pargana Sampgaon of Sarkar Azamnagar and Swadi, all at together rated at 8,30,068 rupees and 12 annas.

(B) The tankha of 19,000 rupees in Pargana Rattehalli was to go to the Jagirdars.

(C) The jagir tankha of 11,000 rupees from the (jagir) fort of Bankapur was to be excluded.

(D) 5 villages rated at 25,000 rupees were to be continued under the old Jagirdars, Aziz Miya and Ahmad Khan Walad Ali Miya.

(E) The Peshwa assured the Nawab that his dominion would be protected from Nizam Salabat Jang.

(F) The Peshwa also gave an assurance that the Nawab's territories would not be harassed by the Maratha troops, and that he would not be troubled for the payment of the tribute every year.[14]

After 1761, which marks the end of one epoch and the beginning of another in Maratha history, the struggle over Savanur began among Madhavrao Peshwa, Hyder Ali and Nizam Ali of Hyderabad. The subjugation of Karnatak by Hyder Ali was the direct outcome of the crushing defeat of the Marathas at Panipat. Hyder defeated Hakim Khan in 1764, wrested Swadi from him, and before long extended his sway upto the banks of the Krishna. Although Madhavrao

tried to bring Savanur under his sway, sometimes with success, yet that principality was mostly under the suzerainty of Hyder Ali. By 1778 Hyder was supreme in this area.


Next year, i. e., in 1779, Hyder made his hold on this area firm by establishing a matrimonial alliance with the Nawab of Savanur. Khair Khan, the son of Hakim Khan, became the son in-law of Hyder. Yet an agreement was signed between Hyder and Hakim by which Hyder was to give back Bagalkot and other mahals to the Nawab of Savanur, in return for which the latter was to maintain a contingent of 2000 cavalry for the help of Hyder.

On the death of Hyder in 1782, the relations between Mysore and Savanur became strained which threw Hakim into the hands of the Peshwa. The Peshwa Government, now controlled by the astute statesman Nana Phadnis, began to take back the mahals of Karnataka one after another, and the Savanur Nawab was taken under protection, to the great chagrin of Tipu. Enraged, Tipu fell on Savanur with a heavy hand, seized it and plundered the property of its Nawab. Yet after the Treaty of Gajendragad in 1787 he had to restore Savanur to its Nawab. Thereafter the Savanur principality generally remained under the Peshwa Government, and its Nawab, Hakim Khan, stayed at Pune only, receiving a monthly pension of Rs. 10,000 till his death in 1795.[15] After his death his successors began to enjoy the pension, and after the Srirangapttan battle a grant of 25 villages with an annual Kamal income of Rs. 48,000 was made to the Nawab, in lieu of the monthly cash pension. And this was continued till the Peshwa rule lasted.[16]


References

1. *Dilerjangi*, p. 2.
2. *Ibid.*, p. 3.

3. E. W. West, *A Memoir of the States of the Southern Maratha Country* (Bombay, 1869), p. 206.
4. J. N. Sarkar, *House of Shivaji*, 3rd ed. (Calcutta, 1955), p. 16.
5. *Ibid.*
6. E. W. West, *A Memoir*, p. 206.
7. *Dilerjangi*, p. 4; E. W. West, p. 206.
8. *Ibid.*, pp–5–6.
9. E. W. West, *op. cit.*, p. 208.
10. Ganesh Chimnaji Vad (comp.), *Selections from the Satara Rajas' and the Peshwas' Diaries* (Bombay, 1906), I, No. 205.
11. E. W. West, *op. cit.*, p. 208.
12. G. S. Sardesai, *Selections from the Peshwa Daftar*, XI, 58, pp. 45-46.
13. *Dilerjangi*, pp. 18–19; *Taha va Kararmadar*, Selected from the Peshwa Daftar by G. C. Vad, and ed. by P. V. Mawjee and D. B. Parasnis (Bombay, 1914) pp. 86–87.
14. *Dilerjangi*, pp. 26–31; *Taha va Kararmadar*, pp. 88ff.
15. E. W. West, *op. cit.*, p. 211.
16. *Ibid.*



२. सावनूर नगराचा नकाशा
(परिशिष्ट १ पहा)



३. सावनूर नगराच्या पूर्वेकडील ' नव-बाग ' व तलाव

विभाग १

दिलेरजंगी

दिलेरजंगी या ग्रंथातील उताऱ्यांची मांडणी पुढील पृष्ठांतून खालीलप्रमाणे केली आहे :

१. उताऱ्याचे संपादकीय शीर्षक व ग्रंथातील पृष्ठ क्रमांक.

२. ग्रंथांतर्गत शीर्षके देवनागरीत ठळक टाइपात असून इतर मजकूर मोडी लिपीत आहे. निवडलेल्या उताऱ्यात ग्रंथांतर्गत शीर्षके असल्यास * अशा चिन्हाने दर्शविली आहेत.

Section I

Dilerjangi

प्रास्ताविक

त्रैमासिकाच्या प्रस्तुत अंकात पुणे येथील अभिलेखागारात (पेशवे दफ्तर) कर्नाटक जमाव या विभागात उपलब्ध असलेली दहा कागदपत्रे प्रकाशित केली आहेत. तथापि सुरुवातीस भा. इ. सं. मंडळात सावनूर नबाबांच्या इतिहासावर लिहिलेल्या एका दुर्मिळ पुस्तकातून अकरा महत्त्वाचे उतारे निवडून येथे पुनर्मुद्रित केले आहेत. हे पुस्तक हाताने लिहून शिळाछापावर मुद्रित केलेले आहे. मागे उल्लेख केल्याप्रमाणे सावनूरच्या नबाबाने सुमारे इ. १६७५ ते १७८७ पर्यंत तेथे राज्य केले, त्यानंतर ते प्रथम पेशवे सरकारचे व नंतर ब्रिटिश सरकारचे एक छोटे जहागिरदार म्हणून इ. १९४८ पर्यंत राहिले.

वर उल्लेखिलेले शिळाछापावरील पुस्तक मोडी लिपीत असून त्यात फुलस्केप आकाराची १९७ पृष्ठे आहेत. मुद्रणस्थळ व मुद्रणतिथी यासंबंधी पुस्तकात खालील-प्रमाणे माहिती नमूद केली आहे.

" धारवाड येथे सुपरिंटेंडेंट रिविन्यू सर्वे दक्षण मराठा कंत्री यांचे छापखान्यात मेहेरबान अब्दुल दलेलखां दलेलजंग बाहादुर यांनी दिल्हेले बुकावरून यांचेच निरोपाप्रमाणे छापिले सन १८६० इसवी."

वरील मजकुरावरून, अब्दुल दिलेरखान यानी दिलेला मजकूर हस्तलिखित स्वरूपात होता की, शिळाछापात होता की पूर्वीचे छापलेले पुस्तकच त्यानी पुन्हा छापावयास दिले, तसेच मूळ मजकूर मोडी (मराठीत) होता की फार्सीमध्ये होता याचा नीटसा बोध होत नाही.

हे पुस्तक सर्वसाधारणपणे ' दिलेरजंगी ' या नावाने ओळखले जाते. याच्या पाच प्रतींसंबंधी खालील माहिती मिळते :*

(१) सावनूरच्या राजवाड्यातील प्रत ही फुलस्केप २५० पृष्ठांची असून, त्यातील मजकूर मोडीत (मराठीत) आहे. त्यावर ' दिलेरजंग दिलेरबहादुर ' असा सावनूर नबाबाचा शिक्का छापला आहे. इ. १९५५ मध्ये सावनूरचे एक रहिवासी श्री. प्रल्हादराव रित्ती यांनी ही प्रत प्राध्यापक ग. ह. खरे यांच्या अवलोकनार्थ आणून दिली होती. त्यात सावनूर नबाबांचा इतिहास सुरुवातीपासून ते इ. १८६०–६५ पर्यंत दिलेला होता. (२) मुंबई प्रत. इ. १९४३ साली मुंबईच्या एका सद्गृहस्थानी प्रा ग. ह. खरे यांना उर्दू किंवा फार्सी हस्तलिखितातील या पुस्तकाची आणखी एक प्रत दाखविली होती. या प्रतीसंबंधी अधिक माहिती सध्या उपलब्ध नाही. (३) मुंबई विद्यापीठाची प्रत. ही मुद्रित असून फार्सी भाषेत आहे. मुद्रण


* ग. ह. खरे, निवडक लेख (पुणे, १९७२), पृ. १७५–१७६.

बहुधा मुंबईत झालेले असून मुद्रणवर्ष इ. १८४६ (हिजरी १२६२) असे आहे. त्यात सावनूर नबाबांचा वंशवृक्ष (गोलाकार) दिलेला असून चार नबाबांची चित्रे दिली आहेत. (४) धारवाड प्रत. मुंबई विद्यापीठ प्रतीचीच ही शिळाछाप आवृत्ती असावी असे वाटते. (५) भा. इ. सं. मंडळ प्रत. भा. इ. सं. मंडळात उपलब्ध असलेली ही प्रत सावनूरच्या राजवाड्यात उपलब्ध असलेल्या फार्सी प्रतीचीच मोडी (मराठी) आवृत्ती आहे की काय हे निश्चितपणे सांगता येत नाही.


दिलेरजंगीचा लेखक कोण असावा ते कळत नाही. परंतु तो सावनूर नबाबांच्या सान्निध्यातील किंबहुना त्यांच्या सेवेतील असून त्याला सरकारी व इतर कागदपत्रे उपलब्ध असावीत असे दिसते. ' जुने कागदपत्र व दस्तऐवज ' यांवर आधारून प्रस्तुतचा इतिहास लिहिला आहे, असे सुरुवातीसच लेखक आवर्जून सांगतो. दिलेर-जंगीतील सर्व तपशील तत्कालीन इतर उपलब्ध मूळ कागदपत्रांतील मजकुराशी जुळतात. मावजी यांनी प्रकाशित केलेल्या ' तह व करारमदार ' या ग्रंथातील पेशवे आणि नबाब यांच्यात इ. १७४७ व १७५६ या साली झालेल्या करारांचे दिलेले तपशील व दिलेरजंगीतील तपशील बरोबर जुळतात. या करारांची मूळ कागदपत्रे पुणे अभिलेखागारात पहावयास सापडतात. ' तह व करारमदार ' या पुस्तकातील अनेक खेड्यांची नावे मात्र चुकीची छापल्याचे आढळून येते. अनेक नबाबांचे गादीवर येणे, मृत्यू, लढाया व तह इत्यादीसंबंधीचे वर्ष, महिना व दिवस इत्यादी तपशील अचूक दिले आहेत व ते तत्कालीन मूळ कागदपत्रांशी ताडून पाहता येतात. त्यामुळे नबाबांच्या खाजगी बाबी सोडल्या तर एकंदरीत हे पुस्तक सावनूरच्या इतिहासासंबंधी बरेचसे विश्वसनीय वाटते. राजकीय, प्रशासकीय तपशीलही विश्वासार्ह वाटतो.

पुस्तकाची सुरुवात शिरोभागी दिलेल्या ' बिशिमिल्लाइ रहिमानिरहीं ' या शब्दांनी होते. सावनूर घराण्याचा संस्थापक अब्दुल करीमखान याच्या आधीच्या एकवीस पूर्वजांसंबंधी सुरुवातीस माहिती येते. औरंगजेब बादशहाने ज्याला ' दिलेरजंग ' असा किताब दिला त्या अब्दुल राऊफखानापासून जास्त तप-शील देण्यास सुरुवात केली आहे. वेगवेगळ्या विभागांचे मथळे देवनागरीत (मराठीत) ठळक, मोठ्या टाइपात दिले असून त्यापुढील मजकूर मोडीत (मराठीत) दिला आहे. तहातील मजकूर मूळ कागदपत्रात जसा आढळला तशा पद्धतीने सही-सही उतरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. पेशव्यांचा शिक्का, लेखनसीमा ही मुळात जेथे होती तशीच या पुस्तकातही दिली आहेत.

दिलेरजंगीतून प्रस्तुतच्या अंकासाठी निवडलेले उतारे आणि पुणे अभिलेखा-गारातील निवडलेली कागदपत्रे ही परस्परांस पूरक अशी आहेत. पेशव्यांनी ज्यास पेन्शनीत काढले त्या अब्दुल हकीमखानाच्या कारकिर्दीपर्यंत दिलेरजंगीतील मजकूर निवडला आहे. आणि पुणे अभिलेखागारातील कागदपत्रांतला मजकूर अब्दुल हकीम-खानानंतरच्या काळासंबंधी आहे. अशा तऱ्हेने कालक्रमानुसार उतारे व कागदपत्र



४. दिलेरजंगीचे पहिले पान (मंडळ प्रत)



१० सावनूर नवाबांची शिक्कावजा गोलातील वंशावळ

(परिशिष्ट २ पहा)

एकमेकास पूरक झाली आहेत.

(१) दिलेरजंगीतील पहिला उतारा म्हणजे पुस्तकातील १ ल्या पानावरील मजकूर आहे व त्याचे छायाचित्रही सोबत दिले आहे. यात अब्दुल करीमखान, मुजाहिदखान, अबू बकखान, कलंदरखान व मुस्तफाखान या पहिल्या पाच पूर्वजांची नावे येतात.

(२) दुसऱ्या उताऱ्यात नबाब अब्दुल हसनखान व नबाब रगटी बहलोलखान या अनुक्रमे एकोणिसाव्या व विसाव्या वंशजांसंबंधी माहिती मिळते. अब्दुल हसनखानाने मुघल बादशाह अकबर याच्या हाताखाली दिवाण म्हणून काम केले. त्याचा मुलगा रगटी बहलोलखान याने शाहजहानाबाद सोडून दक्षिणेत विजापूरच्या अली आदिलशहाकडे सेवा पत्करली. आदिलशहाकडूनच त्याला नांदेड बसवंतची छोटीशी जाहगीर मिळाली.

(३) तिसऱ्या उताऱ्यावरून, रगटी बहलोलखानाचा नातू अब्दुल करीमखान याला विजापूरच्या दरबारात वजीरपद मिळाल्याचे तसेच त्याने कर्नाटकात त्याला मिळालेल्या बंकापूरच्या जाहगिरीसह सावनूरचे राज्य स्थापन केल्याचे कळते.

(४, ५) पुढील दोन उताऱ्यांत, अब्दुल करीमखानाचा मुलगा व वारस अब्दुल राउफखान याने विजापूरच्या राजघराण्याशी विवाहसंबंध जोडला; जेव्हा औरंगजेबाने विजापूरला वेढा घातला त्यावेळी सिकंदर आदिलशाहाने अब्दुल राउफखानाला औरंगजेबाशी बोलणी करण्यास पाठविले; औरंगजेब व सिकंदर आदिलशाह यांची त्याने भेट घडवून आणली व बोलणी होऊन विजापूरचा किल्ला मुघलांकडे आला, इत्यादी मजकूर आहे. राउफखानाची सेवा लक्षात घेऊन औरंगजेबाने त्याला 'दिलेरखान बहादुर दिलेरजंग' हा किताब, ७००० जात व ६००० स्वार यांची मनसब आणि किले सरकार बंकापूर, २२ महालांसह, सरकार आजमनगर (बेळगाव) व सरकार तोरगल यांची जाहगीर इत्यादी बहाल केले (इ. १६८६). अब्दुल राउफला मिळालेल्या राज्याचे उत्पन्न सुमारे चोवीस लाख रु. होते. कित्तूर, सावनूर, शिरहट्टी, नवलगुंद, जालिहाळ, कौजलगी, जुनी हुबळी, मुळगुंद, कोण्णूर येथील जमीनदार आणि मनसबदार या राज्याच्या अमलाखाली होते. नबाबाला यांजकडून खंडणी मिळत असे.

(६) पुढील उताऱ्यात सावनूर नबाबांतील सर्वात नावाजलेला नबाब अब्दुल मजीदखान आणि ज्याची तुलना मलिक अंबर व तोडरमल यांच्याशी करता येईल असा त्याचा दिवाण अलीखान यासंबंधी माहिती आली आहे. या नबाबाच्या कारकीर्दीत सावनूर राज्याचा अधिकाधिक विस्तार झाला, अनेक शहरांना महत्त्व आले आणि शेतसारा वसुलीच्या कारभारात केलेल्या सुधारणांमुळे शेतकरी सुखी झाले, असे कळते. अलीखानाचे वर्णन, तो अत्यंत उदार, मिळते घेणारा व सज्जन होता, असे केले जाते. [सावनूर प्रदेश विजयनगर राज्याच्या आधिपत्याखाली असताना,

सारा आकारणीच्या प्रमाणित परिमाणाला ' रायरेखे ' किंवा ' होलमार ' असे म्हणत असत. एक होलमार म्हणजे चारपासून वीसपर्यंत कूरगी, तर एक कूरगी म्हणजे सुमारे चार एकर होत. सावनूर विजापूरच्या आदिलशाहीच्या स्वामित्वाखाली गेल्यावर, सारा आकारणीच्या या प्रमाणित परिमाणात थोडेफार बदल होऊन त्याला ' रकम ', तसेच ' असल ' किंवा तनखा असे संबोधण्यात येऊ लागले. अलीखानाने रकम आणि तनखा ही दोन्ही परिमाणे बदलून, आपल्या शेतीसुधारणांसाठी, विजयनगर राज्यातील मारचाच मूलभूत परिमाण म्हणून स्वीकार केला. त्याने सारा आकारणीसाठी सुधारित स्वरूपातील प्रमाणित परिमाण सुरू केले; या परिमाणात आधीच्या रायरेखे किंवा होलमारचा जसा समावेश होता, तसाच पुढील काळात होलमारमध्ये भर टाकण्यात आलेल्या इतर करांचाही समावेश होता. सारा आकारणीच्या या नवीन प्रमाणित परिमाणाला ' ऐनाती ' असे संबोधण्यात येऊ लागले.] त्याने पडजमीन एका मारला (मार = ३६ बिघे) एक शेर धान्य अशा महसुली दराने लागवडीसाठी देऊन जमीन खूप मोठ्या प्रमाणात नांगरटीखाली आणली. शेतकऱ्यांनीही या संधीचा फायदा घेऊन अधिकाधिक धान्य पिकविण्याचा प्रयत्न केला. अशा रीतीने राज्याची तिजोरी समृद्ध होत गेली, असे वर्णन आहे.

(७) यापुढील उताऱ्यात, दिवाण अलीखानाच्या नंतरच्या काही दिवाणांची नावे दिली आहेत. अलीखानाच्या मृत्यूची नक्की तारीख कोठेही दिलेली नाही. मुस्तफाखान हा लगेचचा वारस झाला. त्याने राज्योपयोगी काही सुधारणा केल्याचे नमूद केले आहे. तथापि शेवटी हातमखान याने त्याला राज्यावरून दूर केले. हातमखानाच्या दगाबाजीचे प्रायश्चित्त म्हणून त्याचा वध करण्यात आला. यानंतर दिवाणगिरीचे काम अनेकांनी केले, परंतु गिरिधरराव या स्वामिभक्त, हुशार व प्रामाणिक दिवाणाखेरीज इतर नावे नगण्य आहेत.

(८) आठव्या उताऱ्यात नबाब अब्दुल मजीदखान आणि बाळाजी बाजीराव पेशवे यांच्यात इ. १७४७ मध्ये झालेल्या तहाचा मूळ मजकूर दिलेला आहे. सुरुवातीस बाळाजी बाजीरावाचा वाटोळा शिक्का आणि शेवटी लेखनसीमा दर्शविली आहे. या तहातील मजकूर आणि ' तह व करारमदार ' या ग्रंथात पृ. ८६ ते ८८ वर दिलेला मजकूर यात साम्य आहे. या तहात आलेल्या काही स्थळांची नावे ' तह व करारमदार ' या पुस्तकात चुकीची छापली आहेत. उदा. बेळगावचे वाचन बोरगाव, नरेंद्रचे नेरंदर, कागिनेलीचे कोतिनेक, कुपेलूरचे कुदूळकेर, पेठचे देव, हांवसबावीचे बावीसबावी आणि कोणूरचे कानूर असे करून छापले आहे. या तहात आलेल्या महालांची यादी महत्त्वाची आहे, कारण इ. १७८७ च्या सुमारास जेव्हा सावनूरचे राज्य पेशव्यांकडे आले, तेव्हा हेच महाल त्यात होते व त्यांचा एक स्वतंत्र तालुका करून त्याची जबाबदारी पेशव्यांनी भास्कर सखदेवावर सोपविली होती.

(९) क्र. ९ च्या उताऱ्यात अब्दुल मजीदखानने मजीदपूर (हुबळी)

वसविल्याची माहिती मिळते. या शहराच्या पूर्वेस रु. ६४,००० खर्च करून त्याने मोतीतलाव नावाचे एक मोठे तळे बांधले, तसेच त्याने एक उद्यानही वसविले.

(१०) क्र. १० चा उताराही महत्त्वाचा आहे. त्यात पेशवा बाळाजी बाजीराव आणि नवाब अब्दुल हकीमखान यांच्यातील झालेल्या तहाचा मजकूर आला आहे. हा मजकूर ' तह व करारमदार ' यात पृ. ८८ ते ९३ वर आलेल्या मजकुराशी जुळणारा आहे. सर्व आकडेही तंतोतंत जुळतात. तथापि ' तह व करारमदार ' मध्ये, जे महाल पेशव्यांकडे आले त्यांची यादी तीन कलमांतून दिली आहे, तर ' दिलेरजंगी 'त तो दोनच कलमांतून दिली आहे. परंतु एकूण मजकूर तोच आहे. या तहावरही सुरुवातीस बाळाजी बाजीरावाचा वाटोळा शिक्का व शेवटी लेखनसीमा दर्शविली आहे. या तहान्वये पेशव्यांकडे रु. ८,६९,१३९–२–० एवढ्या उत्पन्नाचा प्रदेश व नवाबाकडे रु. ८,३०,०६८–१२–० एवढ्या उत्पन्नाचा प्रदेश ठेवावयाचा, असे ठरले. ('तह व करारमदार 'मध्ये, नवाबाच्या आकड्यात १२ आण्यांचा उल्लेख नाही, तसेच अनेक महालांच्या नावांचे वाचनही चुकीचे झाले आहे.)

(११) शेवटच्या अकराव्या उताऱ्यात नानासाहेब पेशवे व नबाब अब्दुल हकीमखान यांची सावनूर येथे तहाची कलमे पक्की केल्यानंतर जी भेट झाली त्याचे सविस्तर वर्णन आले आहे. एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, या उताऱ्यात असे म्हटले आहे की, नानासाहेबांबरोबर गरोदर असलेल्या त्यांच्या पत्नी गोपिकाबाईही सावनूरला गेल्या होत्या आणि या भेटीच्या दिवशीच माधवराव यांचा सावनूर येथे जन्म झाला.

■ ■

Introductory

The present issue contains 21 documents, of which the first 11 are extracts from a rare lithographed manuscript on the Nawabs of Savanur preserved in the Bharata Itihasa Samshodhaka Mandala, and the remaining 10 are selected from the Karnataka Jamav of the Peshwa Daftar, now known as Pune Archives. The Savanur Nawabs, as mentioned already, ruled over their principality from c.1675 to 1787, and thereafter they remained as Jagirdars, first under the Peshwa Government and then under the British Government enjoying a pension or holding a small jagir in lieu of it until it was finally merged with India in 1948.

The lithographed manuscrpt mentioned above is in Modi and runs into 197 pages of foolscap paper.

The title given to the lithoscript is " Kitab Dalerjangi Nawab Mustatābamo Allā Alakāb Nawab Daler Khān Bāhādur Dalerjang Yanche Khānadānachā Ahawāl. " Thus it is a report or a chronicle on the history of the dynasty of Nawab Diler Khan Bahadur Dilerjang.

In the colophon of the Dilerjangi lithoscript the date of publication and other details are given as under : "

" धारवाड येथे सुपरिंटेंडेंट रिविन्यू सर्वे दक्षण मराठा कंत्री यांचे छापखान्यात मेहेरबान अब्दुल दलेलखां दलेलजंग बाहादुर यांनी दिल्हेले बुकावरून यांचेच निरोपाप्रमाणे छापिले सन १८६० इसवी."

Thus the lithographed book *Dilerjangi* was printed in 1860 at Dharwad in the printing press of the Superintendent of Revenue Survey, Southern Maratha Country, at the instance of Abdul Dilerkhan Dilerjang Bahadur, from a book given by himself. It is not clear from the above whether the " book " given by Abdul Diler Khan was a manuscript or a lithoscript or a printed book, and whether the " book " was written in Modi or Persian.

So far five copies of the work called *Dilerjangi* are known.*

(*1*) *The Savanur Palace Copy* :

This was a manuscrit written in the Marathi language and the Modi script running into about 250 pages of foolscap paper. On each page of this manuscript was stamped the seal of the Sawanur Nawab reading " Dilerjang Diler Bahadur. " In 1955 Prof. G. H. Khare had an occasion to examine it when it was brought to him by one Sri Pralhadrao Ritti, a resident of Savanur. It contained a narrative of the Savanur Nawabs from the beginning to A. D. 1860-65.

(*2*) *The Bombay Copy* : .

In 1943 or so some gentleman from Bombay showed a Urdu or Persian manuscript about the Nawabs of Savanur to Prof. G. H. Khare. More details about this copy are not available.

(3) *The Bombay University Copy* :

This is a printed copy of the *Dilerjangi* in Persian. Its title is *Tarikh-i-Dilerjangi*. It was printed in A. D. 1846 (A. H. 1262) probably in Bombay itself. It contains a genealogy of the Savanur Nawabs and the portraits of four Nawabs.

(*4*) *The Dharwad Copy* :

This seems to be a litho-printed copy of the Bombay University Persian book.

(*5*) *The BIS Mandala Copy* :

The lithograph copy of the *Dilerjangi* is preserved in the Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune. It cannot be definitely said whether this is a Modi version of the Savanur Palace copy which was in Persian.

The author of the work is not known, but must have been a person closely associated with the Nawabs of Savanur,

* G. H. Khare, *Nivadak Lekh* (Pune, 1972), 175-176.

probably in the service of the Nawab having access to the documents and other official papers of the Savanur State. The author specifically says in the beginning that this chronicle is based on old papers and documents (जुने कागदपत्र व दस्ताऐवज). Most of the details given in the *Dilerjangi* are corroborated by other contemporary archival documents. The clauses of the Treaties concluded between the Peshwa and the Nawab in 1747 and 1756, given in this work are almost the same as those published by Mawjee in the *Taha va Kararmadar* (Treaties and Engagements), the originals of which were found in the Pune Archives. But in the latter the names of many villages are wrongly given. The work gives the details of the dates such as the day, the month and the year for many events including the accessions and deaths of a number of Nawabs and also the treaties and battles, and these dates are generally found to be correct when compared with other authentic sources. Hence the work seems to be reliable on the whole, except for accounts dealing with the personal matters of the Nawabs. The political and administrative details can be accepted as fairly reliable and authentic.

